# वि.वि.मंडळाचे सी.गो.पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री, ता.साक्री, जि.धुळे

# * शैक्षणिक अहवाल 2017-2018 *

शिक्षणाद्वारे मानवी मूल्यांचा विकास व्हावा, स्पर्धात्मक युग आणि वास्तविक जीवन यांच्याशी समायोजित होण्याची कला रुजावी, केवळ सुशिक्षीत नव्हे तर सुसंस्कृत चारित्र्य निर्माण व्हावे ही रास्त अपेक्षा 1948 पासून प्रत्येक शिक्षण आयोगाने शिक्षण प्रणालीकडून अपेक्षित केली आहे. याच विचारांनी परिपूर्ण सामाजिक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणास "सर्वांगीण विकासाचे प्रवेशद्वार" म्हणून स्विकारले. याच विचारांची प्रेरणा घेवून आमचे श्रध्दास्थान व प्रेरणास्त्रोत आदरणीय दादासाहेब रामराव पाटील यांनी 1971 मध्ये "ज्ञानयज्ञास" प्रारंभ केला. मा.आबासाहेब सुरेश रामराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय उत्तरोत्तर विकासाची नवी क्षितीजे प्राप्त करीत आहे. विद्वान प्राचार्यांची उज्वल परंपरा असलेले महाविद्यालय, तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण व्हावी व वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा यासाठी महाविद्यालय निरंतर अग्रेसर आहे.

अध्यापक व विद्यार्थी यांच्यात योग्य समन्वय निर्माण व्हावा म्हणून महाविद्यालयात विविध मंडळांची स्थापना करण्यात आली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | राष्ट्रीय सेवा योजना | 2. | युवती सभा | 3. | राष्ट्रीय छात्र सेना |
| 4. | वादविवाद मंडळ | 5. | कला व सांस्कृतिक मंडळ | 6. | विज्ञान मंडळ |
| 7. | वाङ्:मय मंडळ | 8. | सामान्यज्ञान मार्गदर्शन वर्ग | 9. | परीक्षा मंडळ |
| 10. | सामाजिकशास्त्र मंडळ | 11. | विद्यार्थी कल्याण समिती | 12. | क्रिडा विभाग |
| 13. | पर्यावरणशास्त्र मंडळ | 14. | कमवा शिका योजना | 15. | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन |
| 16. | चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन | 17. | सत्यशोधक विचार मंच | 18. | पदव्युत्तर संशोधन केंद्र |
| 19. | IQAC समिती | 20. | रेमेडियल इंग्लिश क्लास | 21. | आजीवन शिक्षण कक्ष |
| 22. | प्राध्यापक प्रबोधिनी | 23. | ग्रंथालय समिती | 24. | प्रसिध्दी समिती |
| 25. | निवडणूक साक्षरता क्लब | | | | |

1971 साली निर्माण झालेल्या या शैक्षणिक संकुलाने 47 व्या वर्षात पदार्पण केले आहे. या महाविद्यालयात आजमितीला कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीपर्यंतचे अभ्यासक्रम, समाजशास्त्र विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम व राज्यशास्त्र, प्राणीशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र विषयातील पदव्युत्तर संशोधन सुविधा उपलब्ध आहे.

*	विद्यार्थी संख्या :-

अहवाल वर्षात वरिष्ठ महाविद्यालयात 1253 कनिष्ठ महाविद्यालयात 566 तर पदव्युत्तर विभागात 33 असे एकूण 1852 विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.  वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात शाखानिहाय शिक्षण घेणारे विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत.

| शाखा | एस.सी. | एस.टी. | एन.टी. | ओबीसीएसबीसी | | | ओपन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ | 22 | 135 | 114 | 267 | 06 | 22 | 566 | |
| वरिष्ठ | 69 | 294 | 178 | 620 | 11 | 81 | 1253 | |
| पदव्युत्तर | | 05 | 07 | 03 | 13 | 0 | 05 | 33 |
| एकुण | 96 | 436 | 295 | 900 | 17 | 108 | 1852 | |

*	वसतिगृह :- 

महाविद्यालयात दुरवरून येणाऱ्या व शिक्षण घेणा-या अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जाती-जमातींच्या, इतर मागासवर्गीय व खुल्या वर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.  महाविद्यालयाच्या वसतिगृहात एकूण 15 विद्यार्थी राहतात, शासकीय आदिवासी वसतिगृहात 138 विद्यार्थी व 179 विद्यार्थीनी राहतात.  वसतिगृहातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते.  त्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडेही विशेष लक्ष पुरविले जाते, त्यांना सर्व आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.  डॉ.ए.पी.निकम वसतिगृहाचे अधिक्षक आहेत.

*	यशाचा आलेख :- महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा ह्यावर्षी देखील कायम राखली आहे. या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेतील 'रसायनशास्त्र' विषयाचा विद्यार्थी महाले सचिन धनराज याने विद्यापीठ गुणवत्ता यादीत चतुर्थ येण्याचा मान मिळविला.

बोर्डाच्या व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल 2017 मध्ये झालेल्या विविध परीक्षांमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे.

| विद्यार्थ्याचे नांव | वर्ग | टक्केवारी | |
|---|---|---|---|
| कु.सोनवणे गायत्री किरण | 11 वी कला | प्रथम | 84.61 |
| कु.चौरे वेशाली छोटू | 11 वी कला | द्वितीय | 75.53 |
| देसले प्रथम दिलीप | 11 वी विज्ञान | प्रथम | 76.77 |
| कु.पाटील उन्नती चंद्रशेखर | 11 वी विज्ञान | द्वितीय | 74.31 |
| भदाणे परेश दिपक | 11 वी वाणिज्य | प्रथम | 71.38 |
| देवरे कुलदिप धनराज | 11 वी वाणिज्य | द्वितीय | 69.84 |
| अहिरे भुषण राजेंद्र | 12 वी कला | प्रथम | 67.38 |

| | | | |
|---|---|---|---|
| कु.पिंजारी अलबिना रफिक | 12 वी कला | द्वितीय | 66.62 |
| कु.कुवर कोमल संतोष | 12 वी विज्ञान | प्रथम | 80.62 |
| सोनवणे ऋषीकेश रावसाहेब | 12 वी विज्ञान | द्वितीय | 78.77 |
| कु.शेवाळे वृषाली संजय | 12 वी वाणिज्य | प्रथम | 75.85 |
| निकुंभ मनोज रविंद्र | 12 वी वाणिज्य | द्वितीय | 74.15 |
| गवळी कैलास नामदेव | प्रथम वर्ष कला | प्रथम | 953 |
| कु.चौधरी पुनम गुलाब | प्रथम वर्ष कला | द्वितीय | 901 |
| कु.सोनवणे शुभांगी किरण | प्रथम वर्ष विज्ञान | प्रथम | 5.96 A+ |
| खैरनार राहूल ज्ञानेश्वर | प्रथम वर्ष विज्ञान | द्वितीय | 5.89 A+ |
| कु.हरळे मानसी बाळकृष्णा | प्रथम वर्ष वाणिज्य | प्रथम | 5.93 |
| कु.अग्नीहोत्री प्रतिक्षा रत्नाकर | प्रथम वर्ष वाणिज्य | द्वितीय | 5.29 |
| कु.शेवाळी वृषाली संजय | द्वितीय वर्ष कला | प्रथम | 85.00 (486) |
| सोनवणे अभिजित अनिल | द्वितीय वर्ष कला | द्वितीय | 85.00 (469) |
| पाटील सागर प्रदिप | द्वितीय वर्ष विज्ञान | प्रथम | 5.76 A+ |
| कु.देसले लिना अनिल | द्वितीय वर्ष विज्ञान | द्वितीय | 5.64 A+ |
| कु.सोनवणे हर्षदा घन:शाम | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम | 5.64 |
| कु.बोरसे डिंपल तुळशीराम | द्वितीय वर्ष वाणिज्य | द्वितीय | 5.29 |
| कु.शेवाळे कविता नारायण | तृतीय वर्ष कला | प्रथम | 85 |
| कु.कुवर अश्विनी दिलीप | तृतीय वर्ष कला | द्वितीय | 84.60 |
| महाले सचिन धनराज | तृतीय वर्ष विज्ञान | प्रथम | 9.53 A+ उमवि गुणवत्ता यादीत चतुर्थ |
| पगारे दिपक दगाजी | तृतीय वर्ष विज्ञान | द्वितीय | 9.09 A+ |
| बोरसे जयेश देविदास | तृतीय वर्ष वाणिज्य | प्रथम | 4.64 A |
| परदेशी लोकेश शामलाल | तृतीय वर्ष वाणिज्य | द्वितीय | 4.39 B |
| कु.सोनवणे भावना रमेश | एम.ए. | प्रथम | 4.94 |
| कु.पाटील शोभा दिलीप | एम.ए. | द्वितीय | 4.75 |

* ग्रंथालय :-

सुसज्ज ग्रंथालय ही प्रत्येक महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेची बाब असते. ज्ञानात वृध्दी, प्रगती करण्याचा हा राजमार्ग आहे. प्रस्तुत शैक्षणिक वर्षात 688 ग्रंथाची खरेदी करण्यात आली असून त्यांचे मुल्य 96645/- रुपये एवढे आहे. एकुण ग्रंथसंपदा 37365 इतकी आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत रहावे या दृष्टीकोनातून वाचन कक्षात 45 नियतकालिके आणि 10 दैनिके मागविली जातात. या व्यतिरीक्त विश्वकोष, ज्ञानकोष, शब्दकोष, संस्कृतीकोष, समाजविज्ञानकोष, विविध विषयातील प्रबंध, विविध संदर्भग्रंथ विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध आहेत. तसेच वाचनकक्षात विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रंथपाल म्हणून श्री.एस.यु.वाघ काम पाहतात.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने ग्रंथालय संगणकीकरणासाठी ग्रंथालयाने ERP SOLUTIONS Nagpur यांचे Master Soft LIBMAN या software ची खरेदी केली असून त्यामधून ग्रंथालय संगणकीकरणास सुरुवात केली आहे. लवकरच ग्रंथालयातील सर्व पुस्तके संगणकीकृत करून देवघेवीसाठी उपलब्ध होणार आहेत. N-List, E-data bases या सर्व्हीसेस देखील ग्रंथालयातून दिली जातात.

* राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस)

1976 पासुन आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एकक कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता विविध उपक्रम एककाद्वारे राबविले जातात. सामाजिक जबाबदारी, सहकार्य, मानवीमूल्य विकसित करणे हे एककाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विशेष हिवाळी शिबिराच्या आयोजनातून ग्रामस्वच्छता अभियान, संस्कृती संवर्धन, अंधश्रध्दा निर्मुलन इ. सारख्या विषयांना चालना देण्याचे भरीव कार्य एकक करीत असते. या एककाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.ए.बी.पाटील, व सहा.कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.आर.जी.काकुस्ते आणि डॉ.पी.एस.साळुंके काम पाहतात.

सल्लागार समिती

| | | | |
|---|---|---|---|
| प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे-अध्यक्ष | | डॉ.व्ही.बी.बच्छाव - | सदस्य |
| प्रा.ए.पी.सोनवणे | - सदस्य | श्री.मच्छिंद्र गोरख गायकवाड - | दत्तक गाव सरपंच |
| विक्की अहिरे | - विद्यार्थी प्रतिनिधी | कु.वैशाली सोनवणे - | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| प्रा.ए.बी.पाटील | - सचिव | | |

राष्ट्रीय सेवा योजनेत नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला 120 तास समाजसेवेचे कार्य करावे लागते व एक विशेष हिवाळी शिबीर करावे लागते. अहवाल वर्षात विद्यापीठाकडून नियमित कार्यक्रमासाठी 250 तर विशेष हिवाळी श्रमानुभव शिबिरासाठी 125 विद्यार्थी सहभागी करून घेण्यास परवानगी मिळाली होती.

---

| अ.नं. | कार्यक्रम | मंजुर संख्या | सहभागी संख्या |
|---|---|---|---|

| | | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी |
|---|---|---|---|---|
| 1 | नियमित कार्यक्रम | 250 | 145 | 105 |
| 2 | विशेष शिबीर | 125 | 74 | 51 |

9 ऑगस्ट 2017 रोजी प्रा.एल.जी.सोनवणे यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे अध्यक्षस्थानी होते. हया एककात एकूण 250 स्वयंसेवक सहभागी आहेत.

अहवाल वर्षात आयोजित केलेले विविध कार्यक्रम

1 ऑगस्ट 2017 - लोकमान्य टिळक पुण्यतिथी व शाहीर आण्णाभाऊ साठे जयंती

7 ऑगस्ट 2017 - रक्षाबंधन

9 ऑगस्ट 2017 - रा.से.यो. उद्घाटन

15 ऑगस्ट 2017- स्वातंत्र्य दिन

20 ऑगस्ट 2017- सदभावना दिवस

22 ऑगस्ट 2017- एक दिवशीय श्रमदान शिबीर

29 ऑगस्ट 2017- कै.सौ.गोजरताई भामरे स्मृतिदिन व रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर

5 सप्टेंबर 2017- शिक्षक दिन

6 सप्टेंबर 2017- निर्माल्य संकलन

23 सप्टेंबर 2017- एक दिवशीय श्रमदान शिबीर

25 सप्टेंबर 2017- रा.से.यो.स्थापना दिवस

27 सप्टेंबर 2017- एक दिवशीय श्रमदान शिबीर

2 ऑक्टोबर 2017- म.गांधी जयंती व लालबाहदुर शास्त्री जयंती कार्यक्रम व स्वच्छता शिबीर

6 ऑक्टोबर 2017- स्वच्छता शिबीर

9 ऑक्टोबर 2017- एक दिवशीय श्रमदान शिबीर

24/12/2017 ते 30/12/2017 विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर

12 जानेवारी 2018- राष्ट्रीय युवा दिन व विवेकानंद जयंती

26 जानेवारी 2018 प्रजासत्ताक दिन

दि.24/12/2017 रोजी शेवाळी येथे शांतीवन अध्यापक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीराचे उद्घाटन जि.प.प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी कु.प्राची साळुंके हीच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, माजी प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे, शेवाळी ग्रामपंचायतीचे सरपंच

श्री.मच्छिंद्र गोरख गायकवाड, शांतीवन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष मा.अरुणदादा नेरकर आदि मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरात विद्यार्थ्यांच्या प्रबोधनासाठी खालील मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 24/12/2017 | कु.जाई भामरे | आम्ही एन.एस.एस.मध्ये कसे घडलो |
| | प्रा.विश्वास भामरे | एन.एस.एस. व सकारात्मक दृष्टीकोन |
| 25/12/2017 | प्रा.डी.एस.चव्हाण | कौशल्य विकास |
| | डॉ.एस.एस.पाटोळे | तंबाखू मुक्त भारत |
| 26/12/2017 | सौ.जोशिला पगारीया | बेटी बचाओ बेटी पढाओ |
| | प्रा.जे.डी.जगदाळे | अहिराणी म्हणीतून प्रकट होणारे भाषा सौंदर्य |
| | प्रा.एस.सी.सोनवणे | जातीमुक्त भारत |
| 27/12/2017 | डॉ.जे.एन.चौबे | स्पर्धा परीक्षा - युवकांमध्ये जाणिव जागृती |
| | प्रा.ए.पी.सोनवणे | कॅशलेस इंडिया |
| 28/12/2017 | डॉ.सतिष म्हस्के | स्वच्छ भारत अभियान |
| | डॉ.अशोक मराठे | वृक्ष संवर्धन व पर्यावरण |
| 29/12/2017 | श्री.पी.झेड.कुवर | अंधश्रध्दा निर्मुलन व जादूटोना विरोधी कायदा |
| | डॉ.सचिन नांद्रे | पाणी व्यवस्थापन |
| 30/12/2017 | श्री.योगेश नांद्रे | अवयवदान/सिकलसेल बाबत जागृती |

ग्रामस्थांसाठी देखील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने

शेवाळी गावातील युवतींसाठी रांगोळी स्पर्धा- विषय - बेटी बचाओ बेटी पढाओ, पर्यावरण संवर्धन

पशुवैद्यकिय चिकित्सा शिबीर, मार्गदर्शन डॉ.आर.एस.कदम, डॉ.एम.पी.कडवे.

पथनाट्यातून जनजागृती व गावातून स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले तसेच गल्लीबोळातील स्वच्छता करून खऱ्या अर्थाने सरकारचे 'एक पाऊल स्वच्छतेकडे' स्वच्छता मिशन सफल झाले. हे सर्व करत असतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे यांनी विशेष श्रम घेतले. या शिबीरात विद्यार्थी कल्याण अधिकारी, जिल्हा समन्वयक प्रा.आर.के.जाधव, तालुका समन्वयक डॉ.सतिष म्हस्के आदी मान्यवरांनी भेटी देवून समाधान व्यक्त केले. त्याच बरोबर स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना कॅशलेस प्रणालीची देखील माहिती दिली व दि.30/12/2017 रोजी प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी मा.प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे मा.प्राचार्य डॉ.पी.डी.देवरे, जिल्हा समन्वयक प्रा.आर.के.जाधव, प्रा.एल.जी.सोनवणे, पर्यवेक्षक श्री.के.जी.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

साक्री नगरपंचायत आयोजित स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत दि.26/9/2017 रोजी स्वच्छता रॅली काढण्यात आली.

* राष्ट्रीय छात्र-सेना (एन.सी.सी)

सन 1978 पासून कार्यरत 48 महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्रसेनेचे पथक महाविद्यालयाची प्रतिष्ठेची बाब आहे. शिस्त निर्मिती, सैनिकी जीवनाबद्दल आदर आणि आवड, राष्ट्र उभारणीत योगदानाची जाणीव इ. उदात्त दृष्टीकोन समोर ठेवून हे एकक सतत कार्यरत असते. अहवाल वर्षात 54 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. बटालियनच्या नियमानुसार 35 परेडस होतात. दर आठवड्याच्या मंगळवारी व बुधवारी दुपारी 2.30 ते 4.40 या वेळेत परेडस् आयोजित केल्या जातात. 15 ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन), 26 जानेवारी (प्रजासत्ताक दिन) यादिवशी छात्र सैनिकांचे संचलन झाले. छात्रसैनिकांनी रक्तदान, स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रमात भाग घेतला.

आमच्यासाठी अभिनंदनीय बाब म्हणजे सिनिअर सार्जंट वाघ रुपेश लक्ष्मीकांत याचीे 26 जानेवारी 2018 च्या आर.डी.परेड दिल्ली येथे निवड झाली.

अहवाल वर्षात 25 छात्रसैनिकांनी "बी" प्रमाणपत्र परीक्षेत तर 12 विद्यार्थ्यांनी "सी" प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केले.

छात्र सैनिकांचा विविध शिबिरातील सहभाग

| अ.नं. | शिबीर | सहभाग संख्या |
|---|---|---|
| 1. | एटीसी धुळे 2017 | 11 |
| 2. | एटीसी धुळे 2017 | 16 |
| 3. | आर्मी ॲटेचमेंट कॅम्प नगर 2018 | 02 |

प्रा.लेफ्टनंट पी.एन.शिंदे हे या विभागाचा कार्यभार पाहतात.

* वादविवाद मंडळ:- विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण व वक्तृत्व कौशल्य विकसीत व्हावे म्हणून वादविवाद मंडळ त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देते. प्रस्तुत शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयातील खालील वादपटूनी विविध स्पर्धेत यश प्राप्त केले.

कनिष्ठ गट जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा 

कु.शिंदे तृप्ती गुलाब प्रथम क्रमांक रु.11000/-

तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा

1. कु.शिंदे तृप्ती गुलाब प्रथम क्रमांक रु.5000/-

वरीष्ठ गट
1. कु.मयुरी केशव सोनवणे प्रथम क्रमांक रु.5000/-
2. कु.रुचिका सुनिल पाटील द्वितीय क्रमांक रु.3000/-
3. कु.कल्याणी संजय हिरं तृतीय क्रमांक रु.2000/-

कु.रुचिका पाटील हीने साक्री, शहादा, धुळे, नवापूर, नाशिक येथे होणाऱ्या महाविद्यालयीन व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. नवापूर महाविद्यालयात झालेल्या वादविवाद स्पर्धेत कु.रुचिका पाटील व कु.सोनाली पाटील यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीत पटकावले.

कु.कल्याणी हिरे हीने शहादा, साक्री, नाशिक येथील स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. याळीच नितेश तुकाराम योने साक्री, धुळे येथील स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. कु.मयुरी सोनवणे हीने साक्री, धुळे येथे आलेल्या स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. प्रा.आर.जी.काकुस्ते या विभागाचे काम पाहतात.

* कला व सांस्कृतिक मंडळ:- महाविद्यालयीन युवक व युवतींच्या अभिनय गुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून मंडळ विद्यार्थ्यांना रंगमंच उपलब्ध करून देते. शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये सांस्कृतिक मंडळाद्वारे नाट्यवाचन, पथनाट्य, विडंबन नाट्य, मुकनाट्य व नृत्य कला प्रकाराचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्याचे काम मंडळाकडून करण्यात आले.

31 जाने.2018 रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आयोजीत धुळे येथे जिल्हास्तरीय युवारंग महोत्सवात वादविवाद, वक्तृत्व, काव्यवाचन, रांगोळी, चित्रकला, फोटोग्राफी, मिमिक्री, मुकनाट्य या 8 कलाप्रकारात 13 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कै.आ.मा.पाटील पिंपळनेर यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय पोवाडा गायन स्पर्धेत कु.वैष्णवी प्रविण पाटील हिने द्वितीय क्रमांकाचे रु.2000/- चे पारीतोषिक पटकाविले. डॉ.संजय सोनवणे, प्रा.आर.जी.काकुस्ते, डॉ.पी.एस.साळुंके व श्री.एम.वाय.कुवर या विभागाचे काम पाहतात.

* विज्ञान मंडळ:- विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयक जागृती निर्माण व्हावी व शंका निरसन व्हावे म्हणुन विज्ञान मंडळ कार्यरत आहेे. या शैक्षणिक वर्षात विज्ञान मंडळाचे उद्घाटन दि.6/10/2017 रोजी साक्रीचे आरएफओ मा.एस.के.शिसव यांच्या हस्ते झाले. जैवविविधता व संवर्धन या विषयावर त्याचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे होते, सहाय्यक आरएफओ श्री.विजय सुर्यवंशी उपस्थित होते.

विज्ञान मंडळ व महाराष्ट्र शासनाचे उर्जा मंत्रालयामार्फत दि.11/1/2018 रोजी महाविद्यालयात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन झाले. त्यावेळी

उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्याचे विद्याुत निरीक्षक एन.पी.गांगुर्डे, सहा.विद्युत निरीक्षक आर.एम.पाडवी, अभियंता के.बी.सगरे, प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे उपस्थित होते.

विज्ञान मंडळामार्फत दि.16/9/2017 रोजी Schizophrenia awarenss या विषयावर पुणे येथील डॉ.अनिल वर्तक यांचे व्याख्यानझाले.

विज्ञान मंडळामर्फत सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, दैनिक लोकमत वृत्तपत्र समुह आणि जिलेट गार्ड ब्लेड आयोजित Event Management and Personality Development या विषयावर जेष्ठ कथाकथनकार सौ.रेखा मुंदडा यांचे मार्गदर्शन लाभले या प्रसंगी लोकमत वृत्तपत्राचे डॉ.लहुपवार, सागर पाटील, प्रशांत पाटील उपस्थित होते.

डॉ.एल.बी.पवार या विभागाचे प्रमुख असून  प्रा.एस.एन.वाघ, प्रा.एम.एच.शेख, प्रा.बी.के.बागुल या विभागाचे काम पाहतात.

*	वाङमय मंडळ:-  महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाङ्मय मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.  विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे व त्यांना प्रेरणा देण्याचे काम वाङ्मय मंडळाच्या वतीने केले जाते.  31 ऑगस्ट 2017 रोजी धरणगव येथील ह.भ.प. प्रा.सी.एस.पाटील यांच्या हस्ते मंडळाचे उद्घाटन झाले.

दिनांक		कार्यक्रम

14/9/2017	हिंदी दिनानिमित्त भारतीय संविधान व राष्ट्रभाषा या विषयावर डॉ.विजय बच्छाव यांचे व्याख्यान झाले.

15/10/2017	वाचन प्रेरणा दिन माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला.

24/1/2017	काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.  यात 34 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.  कु.वृषाली शेवाळे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

डॉ.विजय बच्छाव, डॉ.प्रकाश साळुंके, प्रा.राजेंद्र काकुस्ते, प्रा.अनंत पाटील हे या मंडळाचे काम पाहतात.

*	वाणिज्य मंडळ :- सन 2017-18 या शैक्षणिक वर्षात वाणिज्य विभागातर्फे प्रथम वर्ष वाणिज्य शाखेत प्रवेशीत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ दि.21/7/2017 रोजी द्वितीय व तृतीय वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी आयोजित केला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्नेहभाव व सहकार्याची भावना वाढीस लागते.  व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालयातर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

दि.19/8/2017 रोजी जीएसटी या विषयावरील चर्चासत्रात प्रा.दिनेश भक्कड यांचे व्याख्यान आयेजित केले गेले.

व्यवसाय आणि सामाजिक जबाबदारी, तसेच Art of life and career in commerce या विषयावर प्रा.प्रविण उजागरे यांचे व्याख्यान आयोजित केले.

दि.23/12/2017 रोजी धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे Commerce Quiz Competition मध्ये 3 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

दि.12/2/2018 रोजी एफवायबीकॉम या वर्गाची पर्यावरण जाणीव जागृतीसाठी शैक्षणिक सहल पाटणादेवी, वालझीरी आदि ठिकाणी काढण्यात आली.

सदर विभागाचे काम वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.ए.पी.सोनवणे डॉ.ए.पी.निकम यशस्वीरीत्या सांभाळतात.

*	प्राध्यापक प्रबोधीनी :- प्राध्यापक प्रबोधीनी व सामाजिकशास्त्र मंडळ हे महाविद्यालयाचे खुले व्यासपीठ आहे. महाविद्यालयातील व निमंत्रित मान्यवर अभ्यासकांच्या व्याख्यानांचे प्रसंगोचित आयोजन या मंडळामार्फत केले जाते. वैचारिक प्रबोधन आणि उद्बोधन ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवूनच कार्यक्रमांची आखणी केली जाते.  व्यासंगी वृत्ती व बहुश्रूतता वाढविण्याचे काम यातून साध्य होते.  शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये राबविलेले कार्यक्रम असे.

28/8/2017 प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे, कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालय पिंपळनेर यांचे नॅक मुल्यांकनात प्राध्यापक व संस्था चालकांचा सहभाग याविषयावर व्याख्यान झाले.

28/9/2017 शिवरायांची जन्मतिथी या विषयावर प्रा.एस.सी.सोनवणे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

9/10/2017 भावनिक बुध्दीमता या विषयावर डॉ.जे.एन.चौबे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

डॉ.एस.एस.पाटोळे हे प्रबोधीनीचे काम पाहतात

* विद्यार्थी विकास विभाग :- विद्यार्थी विकास विभाग महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. या विभागाद्वारे निरंतर विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध योजनांची माहिती संकलीत करून त्यांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जात असते. त्याचप्रमाणे विविध विकासात्मक कार्यक्रमही राबविले जातात. चालू शैक्षणिक वर्षात 22 आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून मिळालेले रु.62000/- अर्थसहाय्य वाटप करण्यात आले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत्रात आयोजित विविध कार्यशाळांमध्ये आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे सहभाग नोंदविला.

कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी येथे दि.7 ते 9/9/2017 रोजी झालेल्या विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.लिना राजेंद्र अहिरे | एस.वाय.बी.एस्सी. | रोल नं.8 |
| कु.रोहिणी गंगाधार खैरनार | एस.वाय.बी.एस्सी. | रोल नं.71 |
| कु.निकीता संजय नांद्रे | एस.वाय.बी.एस्सी. | रोल नं.127 |
| महाले रामेश्वर विश्वास | टी.वाय.बी.एस्सी. | रोल नं.31 |
| बोरसे ज्ञानेश्वर सतीष | टी.वाय.बी.एस्सी. | रोल नं.296 |
| सोनवणे यश मधुकर | टी.वाय.बी.एस्सी. | रोल नं.29 |

विमलबाई पाटील महाविद्यालय साक्री येथे दि.13 ते 15/9/2017 रोजी झालेल्या विद्यापीठस्तरीय आपत्कालीन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.काकुस्ते नेहा गिरधर | टीवायबीएस्सी | रोल नं.8 |
| कु.अहिरराव निकीता प्रभाकर | टी.वाय.बी.एस्सी. | रोल नं.7 |
| कु.सामुद्रे श्वेता राजेंद्र | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.153 |
| अहिरे विकी तात्याभाऊ | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.18 |
| मेटकर गणेश मधुकर | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.4 |
| मोरे दिक्षांत प्रकाश | टीवायबीए | रोल नं. |

आदर्श कला महाविद्यालय निजामपूर येथे दि.4/10/2017 रोजी युवती सभा अंतर्गत व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.पुरकर मंजुषा विनोद | एस.वाय.बी.ए. | रोल नं.175 |
| कु.ठाकरे मोनाली राहुल | एस.वाय.बी.ए. | रोल नं.76 |
| कु.वाणी दिपीका चंद्रकांत | एस.वाय.बी.ए. | रोल नं.78 |
| कु.कुवर मिनल निंबा | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.10 |
| कु.माळी मोहिनी संजय | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.11 |

विमलबाई पाटील महाविद्यालय साक्री येथे दि.14/12/2017 रोजी झालेल्या विद्यापीठस्तरीय आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.तडवी रमिला दमण्या | टी.वाय.बी.ए | रोल नं.56 |
| कु.चौरे विमल सुकलाल | एस.वाय.बी.ए. | रोल नं.77 |
| कु.गावित मिना उलुशा | टी.वाय.बी.ए. | रोल नं.23 |
| पाडवी रमेश नारपा | एस.वाय.बी.ए. | रोल नं.29 |
| वसावे चेतन रमेश | एस.वाय.बी.ए. | रोल नं.6 |
| गवळी कैलास नामदेव | एस.वाय.बी.ए. | रोल नं.7 |

श्री.व्ही.एस.नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रावेर जि.जळगाव येथे दि.11 ते 13/1/2018 विद्यापीठस्तरीय मैत्री कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.किर्ती टेंबऱ्या पाडवी | टी.वाय.बी.ए | रोल नं. |
| कु.रमिला दमण्या तडवी | टी.वाय.बी.ए | रोल नं.56 |
| जलसिंग बारक्या पाडवी | एस.वाय.बी.ए. | रोल नं.5 |
| रमेश नारपा पाडवी | एस.वाय.बी.ए. | रोल नं.29 |
| चेतन रमेश वसावे | एस.वाय.बी.ए. | रोल नं.6 |

कै.आर.डी.देवरे महाविद्यालय, म्हसदी येथे दि13/1/2018 रोजी युवती सभा कार्यशाळेत

| | | |
|---|---|---|
| कु.भामरे भाग्यश्री शशिकांत | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.81 |
| कु.सामुद्रे अंजलि राजेंद्र | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.74 |
| कु.महाले करिश्मा युवराज | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.58 |
| कु.बोरसे स्वाती राजेंद्र | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.49 |
| कु.कुवर पुनम गोरख | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.24 |
| कु.मोरे वृषाली विकास | टी.वाय.बी.एस्सी | रोल नं.60 |

विमलबाई पाटील महाविद्यालय साक्री येथे दि.19/1/2018 रोजी युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.पवार निकीता अनिल | एस.वाय.बी.एस्सी | रोल नं.13 |
| कु.पवार स्नेहल अनिल | एफवायबीएस्सी | रोल नं.8 |
| कु.बोरसे जागृती विश्वनाथ | एफवायबीएस्सी | रोल नं.74 |
| कु.शेवाळे निकीता वकिल | एफ.वायबीएस्सी | रोल नं.9 |
| कु.शेवाळे धनश्री हिरालाल | एफवायबीएस्सी | रोल नं.5 |
| कु.बोरसे अंकिता भरत | एसवायबीएस्सी | रोल नं. |

उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय दहिवेल येथे दि.23/1/2017 रोजी रोजगार कौशल्य विकसन कार्यशाळा

| | | |
|---|---|---|
| कु.रुचिका सुनिल पाटील | एफवायबीएस्सी | रोल नं.156 |
| कु.गितांजली रविंद्र अहिरे | एफवायबीएस्सी | रोल नं.40 |
| विशाल संजय वेंडाईत | एफवायबीएस्सी | रोल नं.197 |
| संदीप कृष्णा पवार | एफवायबीएस्सी | रोल नं.191 |
| योगराज यादवराव नांद्रे | एफवायबीएस्सी | रोल नं.31 |

सन 2017-18 या शैक्षणिक वर्षात कमवा व शिका या योजनेत एकूण 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असुन त्यांना डिसेंबर 2017 अखेर पर्यंत रक्कम रु.33920/- एवढे वाटप करण्यात आली. त्यात महाविद्यालयाचा हिस्सा 11640/- व विद्यापीठाचा हिस्सा 22280/- एवढा होता.

या विभागाचे विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून प्रा.एस.डी.पालखे व सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून डॉ.जे.एन.चौबे काम पहातात.

आमच्या महाविद्यालयास काही सन्माननीय देणगीदारांच्या सहकार्याने खालील पारीतोषिके देण्यात येतात.

| देणगीदार | पारितोषिक | पारितोषिक विजेते |
|---|---|---|
| प्राचार्य मा.य.वैद्य | गुणवंत आदिवासी विद्यार्थीनी पारितोषिक | चौधरी पुनम गुलाब |
| प्रा.एल.जी.सोनवणे | कै.डॉ.विनोद जहागीरदार स्मृती पारितोषिक | वाडीले कल्पेश शालीग्राम |
| प्रा.बी.आर.देवरे | कै.राजाराम विठोबा देवरे स्मृती पारितोषिक | भामरे भुषण संजय |
| श्रीमती नलीनी कुलकर्णी | कै.प्रा.रत्नाकर कुलकर्णी स्मृती पारितोषिक | थोरात सिताराम काळू |
| प्राध्यापक वर्ग | कै.शशिकांत नांद्रे स्मृती पारितोषिक | पवार सागर संजय |
| श्रीमती जहागीरदार | कै.डॉ.विनोद जहागीरदार स्मृती पारितोषिक | कु.साळुंके कविता हेमकांत |
| श्रीमती जयश्री शिर्के | कै.यशवंतराव शिर्के स्मृती पारितोषिक | अहिरे भुषण राजेंद्र |
| श्री.गोविंद हबाजी मोरे | कै.गोविंदराव मोरे स्मृती पारितोषिक | कु.सोनवणे भावना रमेश |
| कै.वसंतराव भावराव नांद्रे | कै.शांताबाई भावराव नांद्रे पारितोषिक | कु.शेवाळे कविता नारायण |
| डॉ.आर.आर.अहिरे | कै.श्रीमती सोनुबाई बापू अहिरे पारितोषिक | कु.बेडसे अंकिता भरत |

श्री ए.बी.पाटील  कै.सौ.रंजना अशोक पाटील पारितोषिक    फुलपगारे गौरव दिलीप

श्री ए.एम.पाटील कै.सौ.निर्मला मोतीराम पाटील पारितोषिक वाघ प्रशांत हेमराज

प्रा.व्ही.के.शहा    कै.कांतीलाल शहा स्मृती पारितोषिक        कु.बोरसे डिंपल तुकाराम

या शैक्षणिक वर्षापासुन श्री.मिलींद शिवराम तोरवणे (IAS Officer) यांचेकडून त्यांच्या मातोश्री कै.सौ.अंजनी शिवराम तोरवणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक लाख रुपये मुदत ठेवीच्या स्वरूपात देण्यात आले.  त्या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून विज्ञान विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस रोख पारितोषिक व स्मृतीचिन्ह देण्याचे ठरविले. सदर वर्षी रसायनशास्त्र विषयात प्रथम आलेल्या कु.देसले माधुरी रावसाहेब ह्या विद्यार्थीनीस बहुमान मिळाला.

*        सामाजिक शास्त्र मंडळ :- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये धाडस, प्रेम, त्याग, सेवा व स्वावलंबन ही मूल्य रुजावी म्हणून मंडळ महापुरुषांची जयंती, पुण्यतीथी व त्यांच्या कार्यांना उजाळा देवून मूल्यांचे स्मरण करून देण्याचे काम मंडळ करीत असते.  शैक्षणिक वर्षात मंडळातर्फे दि.1/8/2017 रोजी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करुन त्यांच्या कार्यावर प्रा.एस.सी.सोनवणे यांचे व्याख्यान झाले.

दि.2/10/2017 रोजी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

दि.30/1/2018 महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला.

प्रा.एस.सी.सोनवणे या विभागाचे काम पाहतात.

*        युवती सभा :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास व चेतना जागृतीसाठी महाविद्यालयात युवतीसभा कार्यरत आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवतीसभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा दि.1/2/2018 रोजी संपन्न झाली. तसेच सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

*        चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :- महाविद्यालयातील विविध उपक्रमापैकी एक महत्वाचा उपक्रम म्हणून याकडे पाहिले जाते.  विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांविषयी योग्य मार्गदर्शन मिळावे हा या केंद्राचा उद्देश होय.

शैक्षणिक वर्ष 2017-18 या वर्षात महाविद्यालयातील या केंद्रात 55 विद्यार्थी प्रवेशित असून आकार स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र धुळे यांच्या समन्वयाने दर रविवारी भाषा, इतिहास, राज्यशास्त्र, गणित, बुध्दीमत्ता, भूगोल, विज्ञान, अर्थशास्त्र, चालू घडामोडी या विषयांवर 20 व्याख्याने झाली आहेत.

चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षाविषयी जाणीवजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दि.30/7/2017 या दिवशी स्पर्धा परीक्षांवर आधारीत एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.  याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्रा.सुनिल देशमुख, समन्वयक, युनिक ॲकेडमी जळगाव व प्रा.राहुल पाटील, समन्वयक, युनिक ॲकेडमी धुळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या केंद्रामार्फत वर्षअखेरपर्यंत एकुण 12 विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा व सॉफ्ट स्कील अशा विविध कार्यक्रमात सहभाग घेवून केंद्रातील राहुल खैरनार व कुलदीप कोळी यांनी प्रताप महाविद्यालय अमळनेर या ठिकाणी राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले.

सदर केंद्रातील एकुण 25 विद्यार्थ्यांनी दीपस्तंभ व भामरे गुरु ॲकेडमी धुळे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत सहभाग नोंदविला व केंद्रातील राहुल खैरनार याने या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविला. सदर केंद्रात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अभ्यासिका उपलब्ध करून दिली व त्याबरोबर स्पर्धा परिक्षांविषयीची विविध पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. सदर केंद्रातील विद्यार्थ्यांना दर रविवारी 9 ते 12 या वेळात विविध विषयांवर व्याख्यान दिले जाते. सदर केंद्राचे कामकाज प्रा.एस.आर.गोवर्धने पाहतात.

* सामान्यज्ञान मार्गदर्शन वर्ग:- विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञान व स्पर्धा परीक्ष विषयी अभिरूची निर्माण व्हावी म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव द्वारे 1999 पासून अतिरीक्त विषय म्हणून सामान्यज्ञान सक्तीचा करण्यात आला आहे. या विषयाचे मार्गदर्शनवर्ग नियमितपणे महाविद्यालयात आयोजित केले जातात. वर्षातून दोन वेळेस सराव परीक्षेचे आयोजन केले जाते. अद्ययावत ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्यास महाविद्यालय निरंतर प्राधान्य देते. प्रा.पी.डी.पवार या विभागाचे समन्वयक आहेत.

* अविष्कार 2017-18:- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत दि.21/12/2017 रोजी एस.पी.डी.एम.कॉलेज शिरपूर येथे जिल्हा अविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या महाविद्यालयातील 5 विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन मध्ये भाग घेतला. यातून कु.स्वाती राजेंद्र बोरसे व कु.भाग्यश्री शशिकांत भामरे या 2 विद्यार्थीनींची विद्यापीठ अविष्कार 2017 जळगाव येथे निवड झाली. त्यांना प्रा.डॉ.एस.पाटोळे यांचे मार्गदर्शन लाभले. या विभागाचे समन्वयक म्हणून डॉ.एम.एम.सैंदाणे काम पाहतात.

* पर्यावरणशास्त्र मंडळ :- पर्यावरणाचे महत्व लक्षात घेऊन आज विविध शैक्षणिक स्तरावर पर्यावरणशास्त्र हा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विविध विद्याशाखातील पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण हा विषय सन 2004-05 पासून सक्तीचा केलेला आहे. या विषयाचा प्रकल्प अहवाल तयार करणे सक्तीचे असल्याने पाटणादेवी जंगलातील गौताळ अभयारण्य आणि पितळखोरे या सह्याद्री पर्वताच्या भागात सहलीचे आयोज करण्यात आले त्यासाठी पर्यावरण अभ्यास विभागाचे समन्वयक डॉ.एम.एम.सैंदाणे, डॉ.व्ही.बी.बच्छाव, प्रा.सी.एम.बागुल, प्रा.एस.सी.सोनवणे प्रा.ए.पी.सोनवणे, प्रा.एम.एच.शेख या विभागाचे काम पाहतात.

* सहल:- वर्षभरात वेगवेगळया विभागांनी खालीलप्रमाणे सहलींचे आयोजन केले होते.

शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाची सहल कर्जत, पेण, अलिबाग, बिर्लामंदीर, कशिदाबीच, मुरुड, जंजिरा, महड, रायगड, प्रतापगड, महाबळेश्वर, वाई, प्रतिबालाजी, पुर्ण याठीकाणी गेली तर वनस्पतीशास्त्र विभागाची सहल देवमागेरा येथे गेली. टीवायबीए व एमए या वर्गाची तोरणमाळ परिसरातील आदिवासी समाजाच्या

जीवनाचा अभ्यास या विषयावर समाजशास्त्र विभागाची सहल आयोजित केली होती. भूगोल विभागाची सहल द्वारका, पोरबंद, सोरटीसोमनाथ आणि गीर अभयारण्य या भौगोलिक ठिकाणी गेली. एसवायबीएस्सी प्राणीशास्त्र या विभागाची सहल जेजुरी, प्रतिबालाजी, रत्नागिरी, गणपतीपुळे, रायगड, मुरूड जंजिरा व अलिबाग या ठिकाणी गेली होती. एफवायबीएस्सी प्राणीशास्त्र आयोजित पर्यावरण समृध्दगाव बारीपाडा येथे अभ्यास सहल आयोजित केली होती.

प्रा.एम.एम.सैंदाणे या विभागाचे काम पाहतात.

